दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १६३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५




## बिझनेस मॅन शापूरजी पालोनजी मराठी कॉन्ट्रॅक्टर चे पैसे बुडवणार?




**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२३, जुईनगर (नवी मुंबई) :** प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सिडको ने जुईनगर स्टेशन समोरील भूखंडावर शापूरजी पालोनजी यांची कंत्राटदार म्हणून फेब्रुवारी २०२३ साली नेमणूक केली होती. शापूरजी पालोनजी यांनी सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून पवार आर्टस् चे मालक मोहन पवार यांना सिव्हिल वर्क करण्याचे काम दिले होते. त्यानुसार मोहन पवार यांनी २०२३ साली शापूरजी पालोनजी यांच्या जुईनगर स्टेशन समोर साईट वर काम सुरु केले. सदर साइटवर त्यांचे एकूण ४० लेबर काम करत होते. मोहन पवार यांचे मेजरमेंट चे कंत्राट होते. परंतु शापूरजी पालोनजी यांनी त्यांचा लेबर शिफ्टिंग व इतर कामासाठी वापर करून घेतला.

मोहन पवार यांनी लेबर कामाचे बिल एप्रिल २०२४ ला जमा केले होते, परंतु आजतागायत शापूरजी पालोनजी यांनी त्यांचे बिलाचे पैसे दिलेले नाहीत, आज देतो उद्या देतो असे बोलून टाळाटाळ करत आहेत. १ वर्ष उलटून सुद्धा सब कॉन्ट्रॅक्टर मोहन पवार यांचे पैसे देण्यास शापूरजी पालोनजी टाळाटाळ करत आहेत. म्हणजे एकीकडे गरिबांना घर बांधण्यासाठी प्रधान मंत्री आवास योजना काम करत आहे, त्याचवेळेस दुसऱ्या बाजूला मराठी कंत्राटदारांचे त्याच साईडवरचे कामाचे मेहनतीचे पैसे बुडवले जात आहेत.

याचा जाब विचारण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे, नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनसे विभाग अध्यक्ष अक्षय भोसले यांनी शापूरजी पालोनजी यांच्या जुईनगर स्टेशन समोर साईटवर ठिय्या आंदोलन केले. मराठी कंत्राटदार मोहन पवार यांचे पैसे न मिळाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा मनसे विभाग अध्यक्ष अक्षय भोसले यांनी दिला आहे.

## आता रेशनवर मिळणार ज्वारी ! अहिल्यानगर जिल्ह्यात होणार ३२८८ मेट्रिक टनाचे वाटप




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** स्वस्त धान्य दुकानामार्फत फेब्रुवारी महिन्यात रेशनवर ज्वारीचे वाटप करण्याचा निर्णय अन्न व नागरी पुरवठा विभागाने घेतला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात देखील ३ हजार २८८ मेट्रिक टन ज्वारीचे वाटप केले जाणार आहे. फेब्रुवारी महिन्यात अंत्योदय रेशन कार्ड धारकांना ८ किलो गहू आणि ८ किलो ज्वारी दिली जाणार आहे. प्राधान्य कुटुंब योजनेचे रेशनकार्ड धारकांना प्रति व्यक्ती एक किलो गहू आणि एक किलो ज्वारी दिली जाणार असल्याचे जिल्हा पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, राज्यातील बुलढाणा आणि जळगाव हे दोन जिल्हे ज्वारीचे आगार म्हणून ओळखले जात आहेत. या जिल्ह्यातील ज्वारीचा शिल्लक साठा आणि नवीन उत्पादन लक्षात घेता फेब्रुवारी महिन्यात रेशनवर ज्वारीचे वाटप करण्याचा निर्णय अन्न व नागरी पुरवठा विभागाने घेतला आहे. गरीब आणि दुर्बल गटातील लोकांसाठी अन्नधान्याची सुलभ, किफायतशीर दरामध्ये उपलब्धतेसाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ च्या तरतुदी करण्यात आली. केंद्र सरकारच्या नवीन एकात्मिक अन्नसुरक्षा योजनेस १ जानेवारी २०२३ पासून सुरू केली. अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंबाला पुढील पाच वर्षांसाठी (२०२८ पर्यंत) मोफत धान्य दिले जाणार आहे. अंत्योदय योजनेतील प्रत्येक शिधापत्रिकेवर प्रत्येक महिन्याला ३५ किलो धान्य दिले जाते. त्यामध्ये गहू १५ किलो, तर तांदूळ २० किलो दिला जातो. त्याचबरोबर एक किलो साखर दिली जाते. जिल्ह्यात ८७ हजार ९५० अंत्योदयचे शिधा पत्रिकाधारक आहेत. प्राधान्य कुटुंब योजनेतील प्रत्येक कुटुंबातील सदस्याला पाच किलो धान्य दिले जाते. गहू २ किलो तर तांदूळ ३ किलो दिले जात आहेत. जिल्ह्यात ६ लाख २४ हजार ५३५ शिधापत्रिका धारक आहेत.

## कोळसेवाडी पोलिसांची धडाकेबाज कारवाई




**अक्षराज : भानुदास गायकवाड**


**दि.२२, कल्याण(ठाणे) :** कल्याण पूर्वेतील कैलास नगर परिसरात दि.२१ रोजी दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी होऊन एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने गंभीर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात इसम जखमी झाला असून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी तिघा आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर अन्य आरोपींच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत. या घटनेत पूर्वीच्या वैरातून वाद उफाळल्याचे सांगण्यात आले आहे. तिन्ही आरोपींनी कट रचून धारदार शस्त्रांचा वापर करत जखमीवर हल्ला केला. याप्रकरणी ३०७ आणि १०९ या कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**अटक करण्यात आलेले आरोपी पुढीलप्रमाणे** १) दीपक यादव (काल्या) २) तुषार वाल्मिकी ३) प्रणेश सदावसे तिघांवर न्यायालयात हजर केले असून पीसीआर अंतर्गत पुढील कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. फरार या हल्ल्यातील इतर आरोपी फरार असून पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला आहे. लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, असे आश्वासन पोलिसांनी दिले आहे. अटक आरोपींपैकी दोघांवर यापूर्वीही विविध गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचे मूळ कारण जुने आपसी वैर असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. स्थानिकांनी वाढत्या गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

# गृहमंत्र्यांच्या शहरात गँगवार! २ हत्याकांडांनी नागपूर हादरले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नागपूर :** गृहमंत्र्यांच्या शहरातील हत्याकांडाची मालिका नवीन वर्षाच्या पहिल्याच महिन्यात अद्यापही सुरुच आहे. एकाच रात्रीत दोन हत्याकांडांनी उपराजधानी हादरली आहे. नागपूर पोलिसांचा वचक संपल्यामुळे शहरात गँगवार सुरु झाले आहे. नागपुरातील गंभीर गुन्ह्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या बीट्स गँगच्या सदस्याचा सेवादलनगरात जवळपास ३० जणांनी दगडांनी ठेचून खून केला तर कारागृहातून सुटून आलेल्या गुन्हेगाराचा गुंडांच्या टोळीने चाकूने भोसकून खून केला.




हे दोन्ही हत्याकांड बुधवारी म ध्यरात्रीच्या सुमारास घडले. अमोल बहादूरे (३२, सेवादलनगर, भांडेप्लॉट) असे खून झालेल्या बीट्स गँगच्या सदस्याचे नाव आहे. तर अमोल वंजारी (२२, वाठोडा) असे वाठोड्यात खून झालेल्या गुन्हेगाराचे नाव आहे.

पहिल्या घटनेत, बीट्स गँगचा सदस्य अमोल पंचम बहादूरे याने गेल्या आठ वर्षांपूर्वी तिरंगा चौकात एका युवकाचा भरचौकात खून केला होता. तेव्हापासून त्याचा तिरंगा चौकात दबदबा होता. तेव्हापासूनच तो खंडणी आणि भूखंड बळकावण्याचे काम करीत होता. त्याने दोन साथिदारांच्या मदतीने मुरुम आणि अन्य खणिज विक्रीचा व्यवसाय सुरु केला होता.

तसेच त्याचा व्याजाचा अवैध व्यवसाय आहे. त्यासाठी त्याने घोगलीमध्ये अलिशान कार्यालय घेतले होते.पैशावरुन अमोलचा कुख्यात दिनेश गायकीसोबत चिमणाझरी येथील खदानीवरुन वाद सुरु होता. गेल्या आठ दिवसांपूर्वीच दिनेश गायका हा कारागृहातून सुटून आला.

अमोलने पैसे देण्यास नकार दिल्यामुळे दिनेश चिडून होता. दिनेशने साथिदार प्रवीण ढिंगे, शुभम हटवार, प्रतिक गाठे यांच्यासह जवळपास ३० साथिदार सेवादलनगरात जमा झाले. त्यांनी अमोलला फोन करुन तेथे बोलावले. रात्री ११.३० वाजता अमोल दोन साथिदारांसह कारने तेथे पोहचला. अमोलच्या कारला आरोपींनी घेराव घातला. घाबरेला अमोल कारमधून बाहेर निघत नव्हता. त्यामुळे आरोपींनी त्याच्या कारच्या चारही बाजुच्या काचा फोडून त्याला बाहेर खेचून काढले. भरचौकात त्याचा दगडाने ठेचून खून केला. तर त्याचा साथिदार अमित भुसारी व बंटी या दोन्ही साथिदारांना गंभीर जखमी केले. रात्री उशिरा सक्करदरा पोलिसांनी घटनेची माहिती मिळाली. घटनास्थळावरुन मृतदेह मेडिकलमध्ये रवाना केला. या प्रकरणी हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला असून अद्याप एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही.

**कारागृहातून सुटताच केला खून**

वाठोड्यात दहशत असलेल्या अम ोल कृष्णराव वंजारी (२२, भांडेवाडी, गोंड मोहल्ला) याचा वस्तीतील गुंड एस. प्रधान राजन उईके ऊर्फ गब्बर याच्याशी वस्तीतील वर्चस्वावरुन वाद सुरु होता. त्यामुळे गेल्या काही दिवसांपूर्वी अम ोलने ठार मारण्याची धमकी देऊन गब्बरवर प्राणघातक हल्ला केला होता. या प्रकरणी गब्बरने वाठोडा पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी अमोलला अटक केली. गेल्या दोनच दिवसांपूर्वी अमोल कारागृहातून सुटून आला. गब्बरला जीवाची भीती होती. त्यामुळे त्याने तेजस मेंढे आणि दोन अल्पवीयन साथिदारांच्या मदतीने अमोलचा काटा काढण्याचा कट रचला. बुधवारी रात्री त्याने तीन साथिदाराच्या मदतीने डंम्पींग यार्डच्या भींतीजवळ बसलेल्या अमोलला गाठले. चौघांनीही चाकूने हल्ला करुन अमोलचा खून केला.

# त्या क्षणी मी माझं पक्षप्रमुख पद सोडेन-उद्धव ठाकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, अंधेरी (मुंबई) :** निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदाच आपण समोरासमोर भेटत आहोत. आजपर्यंत २३ जानेवारीचा दिवस म्हणजेच बाळासाहेबांचा जन्म दिवस हा आपण षण्मुखानंद हॉलमध्ये साजरा करत होतो पण दोन महिन्यांपूर्वी निवडणुकांचा जो काही निकाल लागला, मला तो पटलेला नाही असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. तसंच मधे अब्दाली येऊन गेले, कोण तुम्हाला माहीत आहे अमित शाह. त्यांनी सांगितलं की महाराष्ट्रातला विजय उद्धव ठाकरेंना जागा दाखवणारा आहे. जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा काय असतो ते तुम्हाला भविष्यात दिसेल असं म्हणत उद्धव ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आयोजित मेळाव्यातून अमित शाह यांना उत्तर दिलं आहे.

**अमित शाह, मराठी माणसाच्या नादी लागू नका-उद्धव ठाकरे**

मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली. कारण म्हटलं कळू तरी द्या की माझ्याबरोबर किती लोक राहिले आहेत? अमित शाह तुम्ही माझी जागा ठरवू शकत नाही. कारण माझी जागा ठरवणारी बाळासाहेब ठाकरेंनी दिलेली ही माझी शिवसैनिकांची संपत्ती आहे. जे शिवसेनाप्रमुख बोलायचे की जोपर्यंत तुम्ही शिवसैनिक तोपर्यंत शिवसेनाप्रम ुख आहे, तेच मी सांगतो आहे जोपर्यंत तुम्ही आहात तोपर्यंत मी तुमचा पक्ष प्रमुख आहे. गद्दारांनी वार केले तर हा उद्धव ठाकरे संपणार नाही. गद्दारांना गाडूनच मी संपेन अशी गर्जना उद्धव ठाकरेंनी केली.




**त्या क्षणी मी माझं पक्षप्रमुख पद सोडेन-उद्धव ठाकरे**

ज्यादिवशी माझा निष्ठावंत शिवसैनिक म्हणेल की उद्धव तू बाळासाहेबांचे विचार सोडले आहेत त्याक्षणी मी माझं पक्षप्रमुख पद सोडल्याशिवाय राहणार नाही. मला खात्री आहे की ज्या पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या परिवारातला महाराष्ट्र, निर्दयीपणे माझ्याशी वागणार नाही. हार-जीत होत असते. पण मूळात हा विजय भाजपाच्या अनेक लोकांना पचलेला नाही. काहीतरी गडबड घोटाळा नक्की आहे, ईव्हीएमचा तर नक्कीच आहे. ज्या अमित शाह यांनी संपूर्ण सरकारी यंत्रणा वापरुन अडीच वर्षे घटनाबाह्य सरकार लादलं ते असातसा महाराष्ट्र सुटू देतील? असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.

**मोदींच्या अश्वमेधाचं गाढव महाराष्ट्राने लोकसभा निवडणुकीत अडवलं-उद्धव ठाकरे**

मोदींच्या अश्वमेधाचं गाढव म हाराष्ट्राने लोकसभा निवडणुकीत अडवलं. तो फटका अजूनही त्यांच्या वर्मी बसला आहे. त्या घावातून ते सावरलेले नाहीत. त्यांना पक्कं माहीत होतं की महाराष्ट्र गेला तर दिल्ली कोलमडणार आहे.

जर महाराष्ट्रातला निकाल आपल्या मनातला लागला असता तर दिल्लीतलं सरकार कोलमडलेलं दिसलं असतं ही महाराष्ट्राची ताकद आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले. मालेगावात परत येत आहेत अमित शाह. त्यामुळे मी समाचार घेणारच. अफझल खानाचा पोवाडा ऐकला असेल. मिठी मारली तर प्रेमाने मारु पण पाठीत वार केला तर वाघनखं काढू. शरद पवारांनी दगाबाजी केली त्यांना २० फूट जमिनीत गाडलं आहे असंही अमित शाह म्हणाले. पण त्यांना कल्पना नसेल की जी दगाबाजी अमित शाह म्हणत आहेत त्या दगाबाजी केलेल्या सरकारम ध्ये भाजपाचे हशू आडवाणी नावाचे गृहस्थ मंत्री होते. असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला. दगाबाजीची बीजं ही तुमच्यात आहेत आमच्यात नाही, आम्ही तुमचा दगाबाजीचा इतिहास काढला तर श्यामाप्रसाद मुखर्जींपासून सगळं काढता येईल. महाराष्ट्र कधी कुणाशी दगाबाजी करु शकत नाही असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

# शिक्षक भारती संघटनेचे असंतोष धरणे आंदोलन यशस्वी

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२३, पुणे :** माध्यमिक व उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात व पुणे विभागीय उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट कारभारा संदर्भात पुणे शिक्षण आयुक्त कार्यालय समोर असंतोष धरणे आंदोलन आयोजित केले होते. याची दखल घेऊन शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य संपत सूर्यवंशी यांनी सर्व मागण्या व्यवस्थित ऐकून घेतल्या व प्रत्येक मागणीनुसार संबंधितांना तात्काळ सूचना देऊन सोडवल्या जातील असे सकारात्मक आश्वासन सांगितले व संघटनेने देखील समस्या निर्माण होऊ नये यासाठी संघटने कडून मते मागवली यावेळी पुणे, सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील काही पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते यावेळी शालार्थ आय.डी. तात्काळ देण्यात देण्यासाठी संचालक पातळीवर ऑनलाइन स्वरूपात देण्याविषयी चर्चा झाली, वाढीव पदांच्या मान्यता व सम ायोजन त्वरित व्हाव्यात, डी.सी.पी.एस., एन.पी.एस. हिशोब पावत्या त्वरित द्याव्यात, भ्रष्ट व मग्रूर कनिष्ठ लिपिक यांच्यावर दप्तर दिरंगाई कायद्यांतर्गत अंतर्गत कार्यवाही केली जाईल, अर्धवेळ ते पूर्णवेळ मान्यता त्वरित देण्यात येईल, अर्धवेळ शिक्षकांना सेवा शाश्वती दिली जाईल, संच मान्यता प्रचलित पद्धतीने केले जातील वेतन निश्चिती तालुका निहाय शिबिर लावले जाईल, शाळाबाह्य शिक्षकांना कामे देऊ नये या संदर्भात शासनास प्रस्ताव पाठवला जाईल, अतिरिक्त शिक्षक व रिक्त जागा यांची माहिती उपसंचालक कार्यालयातील फलकावर लावली जाईल, वाढीव पदांची राहिलेली यादी फलकावर लावली जाईल, वाढीव पदांच्या राहिलेल्या म ान्यता याची माहिती संघटनेने घेऊन पुराव्यानिशी दाखल करण्यास सूचना संचालक यांनी दिल्या तसेच उपसंचालक, शिक्षणाधिकारी कार्यालयात विविध प्रस्ताव दाखल करण्यासाठी पडताळा सूची देण्यात येईल, नागरिकांची सनद शिक्षण विभागातील प्रत्येक कार्यालयात लावण्याचे आदेश दिले जातील, आदिवासी दुर्गम भागातील कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतन श्रेणी देण्याच्या आदेश माननीय उच्च न्यायालय व माननीय कक्षा अधिकारी मंत्रालय मुंबई यांनी दिले आहेत. त्यांना तात्काळ मान्यता देऊन वेतन निश्चिती केली जाईल, तसेच मा. उच्च न्यायालयाने दिलेले एक स्तर संदर्भातील आदेश यांचे मार्गदर्शन प्रस्ताव मंत्रालय पाठवले जाईल, यावेळी शिक्षण आयुक्त साहेबांनी दोषी कर्मचारी अधिकारी यांना बडतर्फ, निलंबित केले जाईल असे आश्वासन दिले.

# संपादकीय

## डॉ.होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले.

**आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!**

# महाराष्ट्र राज्याच्या दैवताचे जनक!

मालोजी भोसले यांची पत्नी दीपाबाई-उमाबाई हिच्या पोटी सिंदखेड येथे, काही इतिहासकारांच्या मते वेरूळ- घृष्णेश्वर येथे शहाजींचा जन्म दि.१५ मार्च १५९४ रोजी झाला. शहाजी राजेंच्या जन्मस्थळ व जन्मतारखेबद्दल इतिहासकारांत नेहमीप्रमाणे मतभेद आहेत. बाबाजी राजे भोसले यांच्या घरात मालोजी राजे भोसले आणि उमाबाई भोसले यांच्या पोटी शहाजी राजे यांचा जन्म झाला.

त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातोश्री उमाबाईंनी अहमदनगरजवळील शहाशरीफ पीराला अहमदनगर जवळील मुकुंदनगर भागात तारकपूर बस स्टँडपाशी नवस बोलल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली. पुढे सिंदखेडराजा येथील लखुजीराव जाधव यांच्या मुलीशी म्हणजेच जिजाबाईंशी शहाजीराजे यांचा डिसेंबर इ.स.१६०५मध्ये विवाह झाला. या वेळी लखुजीराव व मालोजीराजे हे दोघेही निजामशाहीत होते. पुढे लगेचच मालोजी राजेंचा दुर्दैवी मृत्यू झाला. कालांतराने जसेजसे शहाजी राजे मोठे होत गेले, तसतशी पराक्रम, राजकारण, मुत्सद्देगिरी या बाबतीत त्यांची कीर्ती वाढत सर्वदूर सुगंधासारखी पसरत गेली. मालोजी राजे भोसले हे आपला भाऊ विठोजी राजे भोसले यांचेसह सहकुटुंब सन १५७७मध्ये सिंदखेड येथे लाखुजीराजे जाधव यांच्याकडे नोकरीस आले होते. तद्नंतर शहाजींचे पिता मालोजी राजे यांनी लखुजीराजे जाधव यांची नोकरी सोडून इ.स.१५९९ साली अहमदनगरच्या निजामाची नोकरी मिळवली.

मुघल शहेनशाह औरंगजेब याने इ.स.१६२४ लष्कर खानला १.२ लाख सैन्यासह रवाना केले. सोबत आदिलशहा ८० हजार सैन्य घेऊन निघाला. शहाजी राजेंकडे २० हजार सैन्य होते. त्यातील १० हजार अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवून

तेवढेच त्यांनी स्वतःकडे ठेवले. एवढ्या मोठ्या सैन्याला प्रचंड पाणी लागेल म्हणून मुघल आणि आदिलशाही सैन्याने उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या मेखरी नदीजवळ भातवडी येथे छावणी उभी केली. एरवी दुष्काळग्रस्त असलेल्या अहमदनगरला तेव्हा चांगला पाऊस झाला होता. शहाजी राजेंनी छावणीच्या उत्तरेस धरणाला असे तडे पाडले, की रात्री झोपलेल्या मुघल आणि आदिलशाही छावणीची काही कळण्यापूर्वीच वाताहात झाली. तेव्हा अनेक योद्धे शहाजी राजेंचे बंदी झाले आणि त्यांचे नाव भारतवर्षात दुमदुमले. याच लढाईत त्यांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले. भातवडी हे गाव अहमदनगरपासून पंधरा किमी अंतरावर आहे. नंतर निजामशाही वजीर, फतेह खान, जहान खान यांनी निजामाला मारले आणि राजांना निजामशाहीसाठी मिळवले. शहाजहानने दरम्यान निजामशाहीतील सगळ्या पुरुषांना ठार करविले. उद्देश असा की निजामशहीला वारस रहाणार नाही. तेव्हा राजांनी निजामाच्या नात्यातील छोट्या मुर्तझाला गादीवर बसवून स्वतः कारभार हाती घेतला, जणू स्वतःवरच छत्र धारण केले. ही घटना अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील पेमगिरी किल्ल्यावर घडली. त्यांचा हा स्वतंत्र राज्यकारभार जवळजवळ तीन वर्षे टिकला होता. त्यानी मुर्तझाच्या आईला त्याच्या सुरक्षिततेची हमी दिली.

दिल्लीचा बादशहा शहाजहानने ४८ हजार सैन्य निजामशाही व आदिलशाही संपवण्यासाठी पाठवले; तेव्हा घाबरून आदिलशहा हा शहाजहानला मिळाला. शहाजी व निजामशाहीचा टिकाव लागणे शक्य नव्हते, तरीही शहाजीने नेटाने लढा चालू ठेवला. दरम्यान छोटा मुर्तझा शहाजहानच्या हाती लागला. तेव्हा त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि त्याच्या आईला दिलेल्या शब्दासाठी त्यांनी शहाजहानशी तह केला. या तहांतर्गत मुर्तझा शहाजहानकडे सुरक्षित राहील आणि शहाजी आदिलशाहीला मिळेल. शहाजहानने सावधगिरी म्हणून शहाजीराजांना दक्षिणेला बंगळूरची जहागिरी दिली. बेंगलोर विजयनगर साम्राज्य जे एक जहागिरदार, केम्पे गौडा १ यांचेद्वारे सन १५३७मध्ये स्थापित केले गेले होते, त्यांनी विजयनगर साम्राज्यामधून स्वातंत्र्याची घोषणा केली होती, त्याला सन १६३८मध्ये त्यांचा उपसेनापती, शाहजी भोसले यांच्यासोबत रानादुल्ला खान यांच्या नेतृत्वाखाली एक बड़ी आदिलशाही बीजापुर सेनाद्वारे बेंगलोरवर कब्जा केला गेला होता, ज्यांनी केंम्पे गौडा ३ यांना पराजित केले होते आणि बेंगलोरचे शाहजी यांना जहागिर- संपत्तीच्या स्वरूपात बहाल केली गेली होती. आदिलशाहीत असताना शहाजीराजांनी पुणे परगणा निजामशाहीकडून काबीज केला होता, तोही त्यांच्याकडेच ठेवला.

शहाजीराजांना बंगळूरचा प्रदेश फार आवडला. शहाजीराजे व त्यांचे थोरले चिरंजीव संभाजी राजे यांनी आपल्या मनातील स्वराज्य संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे या ठिकाणी ठरविले. शहाजी मुळातच उत्तम प्रशासक व पराक्रमी योद्धे होते. त्यांनी दक्षिणेतील राजांवर विजय मिळवून दक्षिणेला आदिलशहीचा विस्तार केला. पण हे करताना त्या हरलेल्या राजाना शिक्षा किंवा देहदंड न करता त्यांना मांडलिक केले. त्यामुळे गरज पडली तेव्हा हे राजे शहाजींच्या मदतीला आले. राजांनी आपले पुत्र छ.शिवाजी महाराजांना पुण्यात आपल्या जहागिरीवर स्वतंत्र कारभार चालविण्यासाठी पाठवून स्वराज्य स्थापनेसाठी बरीच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. छ.शिवाजी राजांबरोबर बाजी पासलकर, रघुनाथ बल्लाळ अत्रे, कान्होजी जेधे नाईक व सातारचे शिंदे देशमुख हेही पुण्यात आले. राज्य कारभारासाठीची आवश्यक राजमुद्राही शहाजी राजांनीच शिवरायांना दिली. छ.शिवरायांच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आणि शहाजी राजांची यांस फूस आहे, या संशयाने आदिलशाहीने मुख्य वजीर नवाब मुस्तफाखान याने बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, बाजी पवार, बाळाजी हैबतराव, फतेहखान, आझमखान यांच्या साहाय्याने शहाजी राजांना दगा देऊन कर्नाटकातील जिंजीजवळ कैद केले. साखळदंडांनी बांधून भर विजापुरातून शहाजीराजांना दरबारात हजर करण्यात आले. तो दिवस होता दि.२५ जुलै १६४८चा. हे कळताच छ.शिवाजी महाराजांनी मुत्सद्दीपणाने राजकारण करत दिल्लीत मोगल सुलतान शहाजहानला एक पत्र पाठवले. स्वतः आपण व आपले पिता शहाजी राजे हे दिल्लीपतीची चाकरी करू इच्छितात, असे त्यांनी लिहिले. या बदल्यात शहाजीराजांची विजापूरच्या कैदेतून मुक्तता करावी, ही अट घातली. अशा प्रकारे छ.शिवाजी महाराजांनी शहाजीराजांच्या सुटकेसाठी दिल्लीच्या बादशहाला मधाचे बोट लावले, हा प्रयत्न यशस्वी ठरला. शहाजीराजांची दि.१६ मे १६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका झाली. अफझलखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा अफझलखानाची दगाबाजी माहिती असल्याने शहाजीराजेंनी १७ हजार फौज विजापूरबाहेर खडी ठेवली होती.

शहाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते, की त्यांनी स्वाभिमान राखत आदिलशाही, मुघलशाही व निजामशाही या सर्व सत्ताधीशांकडे काम केले. त्यांच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे टप्पे असे- सन १६२५ ते १६२८- आदिलशाही, सन १६२८ ते १६२९- निजामशाही, सन १६३० ते १६३३- मघलशाही, सन १६३३ ते १६३६- निजामशाही, सन १६३६ ते १६६४- आदिलशाही पुढे सन १६६१ ते १६६२ दरम्यान शहाजीराजे महाराष्ट्रात आले होते. त्यांनी त्यानंतरचा काही काळ छ. शिवाजीराजे व जिजाबाईंसमवेत घालवला. आपण लावलेल्या स्वराज्याच्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाल्याचे पाहून ते धन्य झाले. काही काळानंतर ते पुन्हा आपल्या जहागिरीत परतले. माघ शुद्ध ५, म्हणजेच दि.२३ जानेवारी १६६४ रोजी होदेगिरीच्या जंगलात शिकारीला गेले असताना त्यांच्या घोड्याचा एका वृक्षवेलीमध्ये पाय अडकला व ते खाली कोसळले आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजांनी राजपरंपरेप्रमाणे शहाजीराजांची उत्तरक्रिया केली व समाधी शिमोग्याजवळ होदेगिरी जिल्हा दावणगिरी- कर्नाटक येथे बांधली.

**!! शहाजी राजेंना त्यांच्या पुण्यस्मरणदिनी विनम्र अभिवादन !!**

**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप– ९४२३७१४८८३.**

## दावोस संधी..



निवडा हवी ती रत्ने
भरला खुला दरबार
संधीचे करावे सोने
वेळ ना येते बारबार

दावोसी सुवर्ण संधी
घडवा छान अलंकार
दुफळी एकमेकांतली
लांब ठेवावा अहंकार

सत्ताधारीविरोधकांत
समन्वय करी साकार
लोक कल्याणासाठी
घ्यायचा मैत्री आकार

बदलू पाहे वातावरण
जाण प्रगतीचा हुंकार
वाट पाही बेरोजगार
घडावे काहीचमत्कार

सामंजस्य करे करार
परिपूर्ण ते सोपस्कार
समृद्धीचा नवगणेशा
प्रसन्न होईलं ओंकार

प्रत्यक्षांत यावे करार
प्रकल्प सार्थ इकरार
खुस्पट काढून काही
नंतर नको रे इन्कार

कुणाचे वर्तन कसले
पहात असे मतदार
आज बसे विरोधात
उद्या खुले संधी द्वार

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे आपले राष्ट्रीय कर्तव्य !



प्रजासत्ताक दिन अगदी तोंडावर आल्याने सर्वत्रचे वातावरण तिरंगामय होऊ लागले आहे. कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने सरकारच्या वतीने 'हर घर तिरंगा मोहीम' राबवली जात असल्याने घरोघरी त्यादृष्टीने सिद्धता सुरु झाली आहे. कपडच्यांच्या दुकानांचे डिस्प्ले तिरंगी कापडांनी सजू लागले आहेत. अन्य दुकानेही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा वापर करून दुकानाबाहेर सजावट करू लागले आहेत. सामाजिक माध्यमांवर देशप्रेमाचे स्टेटस आतापासूनच झळकू लागले आहेत.

अनेक कार्पोरेट कंपन्यांनी शुक्रवार आणि शनिवारी कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी तिरंगा रंगांची अथवा पारंपरिक पोषाखाची थीम ठेवली आहे. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळांमध्ये, शाळा महाविद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धताही सध्या जोमाने सुरु आहे. ऑनलाईन शॉपिंग संकेतस्थळांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्पादनांवर विशेष सवलत ठेवली आहे. हिंदी मराठी चॅनल्सवरील डेली सोप आणि रिऍलिटी शोजमध्ये सुद्धा सध्या प्रजासत्ताक दिनाचाच फिवर आहे. मिठाईच्या आणि केक्सच्या दुकानांत तिरंग्याच्या रंगाच्या विविध मिठाया आणि केक्स विक्रीसाठी आले आहेत. सारे वातावरण देशभक्तीने जणू न्हाऊन निघत आहे. 'वंदे मातरम म्हणावे कि म्हणू नये', 'राष्ट्रगीताला उभे रहावे कि उभे राहू नये', 'भारतमाताकी जय म्हणणे देशभक्तीचे लक्षण आहे की नाही', यांसारख्या विषयावर वर्षभर चवीने चर्चा होत असली, तरी प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन जवळ आला कि देशभरात देशप्रेमाचे वारे जोराने वाहू लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कागदी आणि कापडी राष्ट्रध्वज सर्वत्र विक्रीसाठी आले आहेत. ५-१० रुपयांत मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे; मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे का हे अभ्यासनेही आज गरजेचे बनले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हालअपेष्टा सहन केल्या; मात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देशप्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही.

राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यावर पडलेले ध्वज आणि ध्वजांचे अवशेष गोळा करून त्यांची ध्वजसंहितेनुसार योग्य ती विल्हेवाट लावण्याचे काम काही स्वयंसेवी संघटना दरवर्षी करत असतात. मात्र त्यांच्यावर ही वेळ येऊच न देण्याची जबाबदारी आपली नव्हे काय ? स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले राष्ट्रप्रेम दाखवण्यासाठी राष्ट्रध्वजाचे बॅज आपण छातीवर लावून मिरवतो. गाड्यांवर, घरांवर, दुकानांवर ध्वज फडकावतो, कागदी ध्वज विकत घेऊन ते पाल्यांना देतो; मात्र ते फाटतात, हरवतात तेव्हा' जाऊ दे, १० रुपयांचा तर झेंडा होता' असे विचार आपल्या मनात येतात आणि आपण ते शोधायचा प्रयत्नही करत नाही.

या दिवशी रस्त्यावरून जाताना एखादा ध्वज रस्त्यावर पडलेला दिसला तर तो उचलून खिशात ठेवण्याचा विचार तर येतो मात्र आजूबाजूचे लोक काय म्हणतील या विचाराने आपण तसे करण्याचे टाळतो. खरेदी केलेले ध्वज पुढील राष्ट्रीय सणासाठी जपून ठेवतो का किंवा ते फाटले असतील तर ध्वजसंहितेनुसार त्या ध्वजांची विल्हेवाट लावतो का ? आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही.

राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, घरादाराची राखरांगोळी केली, आयुष्यभर कारावास भोगला. त्यांच्याच बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगत आहोत. लोकशाही व्यवस्थेच्या सुख सुविधा उपभोगत आहोत. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी आजही आपले सैनिक सीमेवर ऊन, वारा, पाऊस कशाचीच तमा न बाळगता खंबीरपणे उभे असतात त्या राष्ट्रध्वजाचे उचित मूल्य आपल्या अंतर्मनात बिंबायला हवे. राष्ट्रीय सणांच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा एकही राष्ट्रध्वज रस्त्यावर इतस्ततः पडलेला दिसणार नाही तेव्हाच आपल्यातील राष्ट्रध्वजाविषयीची अस्मिता जागृत झाली असे म्हणता येईल.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नेताजी सुभाषचंद्र बोस, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना महापालिका मुख्यालयात अभिवादन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, पनवेल :** महानगरपालिकेच्या मुख्यालयात गुरुवार, दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, उप अभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, माजी नगरसेवक, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कामगार आयुक्तांच्या आश्वासनंतर लोकसत्ता युवा श्रमिक संघटनेचे आमरण उपोषण तूर्त मागे



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२३, उदगीर (लातूर) :** उदगीर मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी करावी. इमारत व इतर बांधकाम काम गारांसाठीचे बंद करण्यात आलेले ऑनलाईन पोर्टल पूर्ववत सुरु करण्यात यावे, बांधकाम कामगारांना ५ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे. प्रलंबित नोंदणी नूतनीकरणाचे अर्ज तात्काळ मंजूर करावेत, ६ लाख रुपये घरकुल कर्ज मंजूर करण्यात यावे. या व इतर मागण्यासाठी लोकसत्ता युवा श्रमिक संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इलाही शेख यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले होते. मात्र दुपारी २ वाजता कामगार सह आयुक्त मंगेश झोले यांनी प्रत्यक्ष उपोषणस्थळी भेट देऊन बांधकाम कामगारांच्या समस्या जाणून घेतल्या आणि या उपोषण आंदोलनातील त्यांच्या अधिकारात असलेल्या मागण्या मंजूर केल्या. तसेच ऑनलाईन पोर्टल सुरु करण्याबाबत शासन स्तरावर पाठपरावा करण्याचे आश्वासन दिल्यामुळे सदरचे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील संबधीत अधिकारी, लोकसत्ता युवा श्रमिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इलाही बशीरसाब शेख, शहराध्यक्ष आसिफ निचलकर, कामगार जिल्हाध्यक्ष इरफान कुरेशी, अब्दुल पठाण, किरण राठोड, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आगासन ग्रामस्थांनी आरक्षण रद्द करण्या संदर्भात आमदार मोरे यांना निवेदन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, दिवा (ठाणे) :** आगासन गावातील खाजगी जागेवरील अन्यायकारक आरक्षण तात्काळ हटवण्यात यावे. रस्ते गावाबाहेरून घ्यावे. यासाठी आगासनगाव संघर्ष समितीच्या वतीने गुरुवार, दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांची भेट घेऊन या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. सदर आरक्षण हे हटवण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे व ठाणे महानगरपालिका आयुक्त यांच्याबरोबर गावकऱ्यांची संयुक्त मिटींग लावून हा प्रश्न सोडवण्यात येईल असे आश्वासन आमदार राजेश मोरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना आश्वासित केले. यावेळी आगासनगाव संघर्ष समितीतर्फे आमदारांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी आगासनगाव संघर्ष समितीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे शिबिराचे आयोजन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, दिवा (ठाणे) :** गुरुवार, दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी आगासन गावातील दत्त मंदिर येथे सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांचे आधार कार्ड विलामूल्य, काढून देण्यात आले. आधार कार्ड अपडेट करणे, आभाकार्ड श्रम कार्ड व आयुष्मान कार्ड हे सर्व गावातील नागरिकांना मोफत देण्यात आले. तसेच सुकन्या योजनेचे फॉर्म सुद्धा भरून देण्यात आले. फक्त आधार कार्ड अपडेटसाठी फी घेण्यात आली. या शिबिराचा सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. नागरिकांपर्यंत जास्त जास्त या योजनेचा लाभ पोहोचावा यासाठी आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले होते. नागरिकांनी चांगला प्रतिसाद शिबिराला दिला आहे. अशी माहिती अध्यक्षा उषा मुंडे यांनी दिली आहे.

## पुंडलिक कृष्णाजी पोळ यांचे निधन



**अक्षराज : राहुल शिंदे**


**दि.२३, पेठ वडगांव (कोल्हापूर) :** पेठ वडगांव अंबा रोड पोळ गल्ली येथील पुंडलिक कृष्णाजी पोळ वय (८१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जलसंधारण विभागाचे उप विभागीय अधिकारी योगेश पोळ व जिनिअस स्कूलचे अध्यक्ष महेश पोळ यांचे ते वडील होते.

# तुळजापुरात कौशल्य विद्यापीठ होणार

## जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठ करणार तांत्रिक सहकार्य

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२३, धाराशिव :** येत्या काळात धाराशिव जिल्ह्यात अपारंपारिक ऊर्जा, टेक्निकल टेक्स्टाईल उत्पादन, कृषी पूरक उद्योग त्यासोबतच पर्यटन वाढीला मोठा वाव मिळणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळही लागणार आहे. जिल्ह्यातील होतकरू आणि गरजू तरुणांना जिल्ह्यासह राज्य आणि देशात सहज रोजगार मिळावेत. यासाठी तुळजापूर येथे कौशल्य विद्यापीठ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यापीठाच्या सहकार्याने यासह पुढील महिनाभरात जावा सारखे महत्वपूर्ण आणि अल्पमुदतीचे, रोजगाराभिमुख कौशल्य विकास अभ्यासक्रम तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू केले जाणार आहेत. धाराशिव जिल्ह्यात महायुती सरकारच्या माध्यमातून तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्या सहकार्याने अनेक म हत्वाचे प्रकल्प मोठ्या गतीने पुढे जात आहेत. विविध योजना, प्रकल्प, उद्योग आणि पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्यात ३५ हजार रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आपण डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यानुसार पुढील एक-दोन वर्षात आपल्याला मोठे कुशल मनुष्यबळ लागणार आहे. या अनुषंगाने स्थानिक युवकांना



आधुनिक, एकात्मिक आणि व्यापक असे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन कौशल्यधारित शिक्षणाद्वारे रोजगारक्षम बनवण्यासाठी तुळजापुरात कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याची संकल्पना आपण मांडली आहे.

तुळजापूर येथे कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यापीठाचा नुकताच दौरा केला. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुझुमदार यांच्याकडून सिम्बायोसिसमार्फत चालविल्या जात असलेल्या कौशल्य विद्यापीठाची माहिती जाणून घेतली. या कौशल्य विद्यापीठात कोणते अभ्यासक्रम आहेत, त्यांच्या उपक्रमांची रूपरेषा काय याचे विस्तृत सादरीकरण सिम्बायोसिसच्यावतीने करण्यात आले व तुळजाभवानी कौशल्य विद्यापीठाचा मास्टर प्लॅन करण्याचे ठरले आहे. सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठ आणि तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात लवकरच सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली जाईल तसेच 'जावा' सारख्या कमी कालावधीच्या व लगेच नोकरी मिळेल अशा कोर्सेची लगेच सुरुवात केली जाईल. त्यानंतर सिम्बायोसिसचे अनुभवी आणि तज्ञांचे पथक धाराशिव जिल्ह्यातील एकूण भौगोलिक परिस्थिती, जिल्ह्यातील शेती आणि त्यावर आधारित शेतीपूरक उद्योग आदी बाबींची सखोल माहिती घेऊन कृषी-व्यवसाय, पर्यटन आणि अपारंपारिक ऊर्जा सारखे डिप्लोमा/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करण्यास मदत करणार आहे.

**कौशल्य विद्यापीठामुळे तरुणांना हक्काचा रोजगार मिळण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार -**

कौशल्य विद्यापीठ हे उच्च दर्जाचे कौशल्यपूर्ण आणि रोजगारक्षम तरुण निर्माण करण्यासाठी, रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि उच्च दर्जाचे कौशल्य शिक्षण, स्टार्टअप्स, इनक्युबेशन, रोजगारक्षमता, प्रशिक्षण, समुपदेशन, नोकरीवर आधारित प्रशिक्षण, याला प्रोत्साहन देण्यासाठी एक विशेष विद्यापीठ असणार आहे. त्यातून प्लेसमेंटही मोठ्या प्रमाणात होणार आहे. प्रशिक्षणानंतर मूल्यांकन यंत्रणेमार्फत मूल्यांकन करून पात्र तरुणांना हक्काचा रोजगार मिळण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

## शिवनेरी सेवा, नवोदित संघ, जय भारत, यंग प्रभादेवी यांनी किशोर गटात दुसरी फेरी गाठली

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२३, मुंबई :** शिवनेरी सेवा, नवोदित संघ, जय भारत, यंग प्रभादेवी यांनी अमरहिंद मंडळाने आयोजित केलेल्या किशोर गटात दुसरी फेरी गाठली. महिला विभागात जिजामाता महिला संघ दुसऱ्या

फेरीत दाखल. दादर पश्चिम येथील अमरहिंद मंडळाच्या पटांगणावर सुरू असलेल्या किशोर गटात शिवनेरीने ५-५ चढायात काळाचौकीच्या अमर मंडळाला ५२-५१(६-५) असे पराभूत केले. सामन्याच्या पहिल्या क्षणा पासून शेवटच्या क्षणापर्यंत काळजाचा ठोका चुकविणाऱ्या या सामन्यात अखेर शिवनेरी एका गुणाने बाजी मारली. पूर्वार्धात २२-२२ अशी, तर पूर्ण डावात ४६-४६ अशी बरोबरी होती.





वेदांत सावंत, आर्यन सुळे शिवनेरी कडून, तर हर्ष चव्हाण, उत्कर्ष बडवे अमर कडून उत्कृष्ट खेळले. नवोदित संघाने चुरशीच्या लढतीत गौरीदत्त मित्तल संघाला ४८-४६ असे नमवित आगेकूच केली. विश्रांतीला ३३-१७ अशी आघाडी घेणाऱ्या नवोदितला नंतर मात्र विजयाकरिता गौरीदत्त मित्तलने शर्थीची लढत दिली. गणेश कांबळे, मानस सावंत यांनी नवोदित कडून, तर सुंदरम गुप्ता, विजय माखी यांनी गौरीदत्त कडून चतुरस्त्र खेळ केला.याच गटात जय भारतने श्रेयस मटकर, अर्णव बावडेकर यांच्या झंझावाती खेळामुळे दुर्गामाता स्पोर्ट्स् वर ६७-४४ असा विजय मिळविला. दुर्गामाताच्या सोहम जाधव, आर्यन जाधव बरे खेळले. आदित्य सदाफुले, साई साळेकर यांच्या तुफानी खेळाच्या बळावर अमर संदेशचा ६६-३७ असा धुव्वा उडविला. महिलांच्या सामन्यात जिजामाता महिला संघाने श्री स्वामी समर्थ मंडळावर ३६-१७ अशी मात केली. आक्रमक सुरुवात करीत पहिल्या डावात २६-०९ अशी आघाडी घेणाऱ्या जिजामाताने नंतर सावध खेळ करीत सामना आपल्या बाजूने केला. प्रीती हांडे, कृतिका चव्हाण यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. स्वामी समर्थची साक्षी जंगम बरी खेळली.इतर निकाल संक्षिप्त किशोर गट :- १)वारसलेन वि. वि. शताब्दी (४५-२५); २) गोलफादेवी वि. वि. गुड मॉर्निंग (६१-४८); ३)यश मंडळ वि. वि. वीर संताजी (५३-१४); ४) बाल उत्कर्ष वि. वि. विजय क्लब (५९-१२). सर्व विजयी संघांनी दुसरी फेरी गाठली.

## नालासोपाऱ्यात अनधिकृत बांधकाम कारवाईत गरिमाचा आक्रोश; अनेक कुटुंबांचे संसार आले उघड्यावर

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, नालासोपारा :** महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम कारवाईत आज नालासोपाऱ्यातील अनेक कुटुंबांचे संसार अक्षरशः उघड्यावर आले.या कारवाईमुळे अनेक कुटुंबे बेघर झाली असून लोकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.दरम्यान या कारवाईत गरिमा शिवसहाय गुप्ता,ही वसईतील जी.जी.जे वर्तक विद्यालयात दहावीची विद्यार्थिनी आहे. तिच्यावर या घटनेचा खोल परिणाम झाला आहे.मुंबईला लागूनच असलेल्या नालासोपाऱ्यामध्ये सध्या उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरु आहे.एकूण ३४ बेकायदा इमारती पाडण्यात येणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरुन ही कारवाई होत असल्याने मुबलक पोलीस बळ म्हणजे ४०० पेक्षा जास्त पोलिसांचा बंदोबस्त या कारवाईत तैनात ठेवला आहे. वापर करून ही कारवाई होत आहे.या कारवाईनंतर जवळ जवळ २०० कुटुंब बेघर होणार आहेत. नालासोपारा पूर्वेला अग्रवाल नगरी येथील लक्ष्मी नगरमध्ये डंपिंग ग्राउंड आणि एसटीपी प्लांटसाठी आरक्षित भूमिवर ४१ बेकायद इमारती बांधण्यात आल्या होत्या.

मुंबई उच्च न्यायालयाने या इमारतींना बेकायद ठरवून पाडण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाच पालन करताना वसई-विरार महानगर पालिकेने ३४ इमारतीमधील रहिवाशांना २२ जानेवारी २०२५ पर्यंत घर खाली करण्याची नोटीस बजावली होती. परंतु कुणीही घरे खाली न केल्यामुळे पालिकेने अखेर आज कारवाईस सुरुवात केली.दरम्यान वसई-विरार महानगरपालिकेकडून नालासोपा-यात सुरू असलेल्या तोडक कारवाई मुळे दहावीत शिकणाऱ्या गरिमा गुप्ता हिच्या आक्रोशाने प्रत्येकाच्या डोळ्यात आज अश्रू अनावर झाले आहेत. या कारवाईमुळे अनेक कुटुंब बेघर झाली असून लोकांमध्ये संतापाची भावना



आहे. गरिमा शिवसहाय गुप्ता, ही वसईतील जी.जी.जे वर्तक विद्यालयात दहावीची विद्यार्थिनी आहे. तिच्यावर या घटनेचा खोल परिणाम झाला.आज तिची हिंदीची परीक्षा होती. ज्यासाठी तिने कठोर तयारी केली होती. मात्र, परीक्षा संपल्यानंतर ती घरी परत आली तर तिच्या डोळ्यादेखत घर उध्वस्त होताना पाहिलं. ते पाहून तिने हंबरडा फोडला. गरिमाचे आई-वडिल हे भाजी विक्रीचा व्यवसाय करतात, माझ्या आई वडिलांनी कष्ट करून हे घर उभारलं होतं. याच घरात माझं भविष्य होतं. अचानक झालेल्या कारवाईमुळे आमच्या आयुष्याचा आधार हिरावला गेल्याची प्रतिक्रिया गरिमान् दिली आहे. गरिमाच्या शैक्षणिक आयुष्यावरही या प्रकाराचा गंभीर परिणाम झाला आहे. आता बेघर झालेली गरिमा व तिचं कुटुंब पुढच्या वाटचालीसाठी चिंतेत आहे. भाजपा सरकार लोकांना मोफत घर देण्याचे स्वप्न दाखवत आहे. मात्र इकडे आमच्या कष्टाच घर आमच्या डोळ्यासमोर उध्वस्त केलं जात आहे. आम्ही आता कुठे जावं असा प्रश्न गरिमा सर्वांना विचारत आहे.

## नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.२३, (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा २९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नवी मुंबईचे शिल्पकार समजले जाणारे आमदार गणेश नाईक यांनी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेची सुरुवात सन १९९६ रोजी केली. या वर्धापन दिनाला नवी मुंबई म





हानगरपालिकेच्या आयुक्त कैलास शिंदे, आमदार मंदाताई म्हात्रे, माजी आमदार संजीव नाईक, मंत्री गणेश नाईक, संदीप नाईक, परिवहन व्यवस्थापक योगेश कडुसकर, परिवहनचे मुख्य व्यवस्थापक उमाकांत जंगले आदी उपस्थित होते. आमदार गणेश नाईक यांनी बोलताना कामगारांना वैद्यकीय विमा कामगारांची रखडलेली पगारवाढ व कामगारांना लवकरात लवकर कायम करण्याचा प्रस्ताव आयुक्तांकडे मांडला. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन ही संस्था ही देशातील नंबर वन ची परिवहन संस्था आहे असेही त्यांनी सांगितले त्यांनी सर्व परिवहन मधील कामगारांना व वर्धापन दिनाच्या मंगलमय व आरोग्यदायी शुभेच्छा दिल्या.

# नैताळे येथील श्री मतोबा महाराज यात्रेला अलोट गर्दी

## लाखो भाविक भक्तांचे नवसाला पावणारे दैवत

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, विंचूर (नाशिक) :** नाशिक छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथील ग्रामस्थांचे आराध्य दैवत श्री.मतोबा महाराज हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे दैवत असल्याने श्री.मतोबा महाराज यात्रोत्सवास मकर संक्रांतीच्या एक दिवस अगोदर पासून पौर्णिमेला प्रारंभ झाला. कोणत्याही प्राण्यास अथवा मनुष्यास कुठेही विंचू ,साप, इंगळी चावली असेल तर श्री.मतोबा महाराज यांच्या नावाने नुसता अंगारा लावला. तरी त्याचा चावा घेतलेल्या ठिकाणची विषबाधा कमी होते. अशी लाखो भाविकांची श्रद्धा आहे. या श्रद्धेपोटीच हजारो भाविक देवाला नवस करतात. हाच नवस फेडण्यासाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून भाविक नैताळे येथे येतात. व मनोभावाने दर्शन करून देवाच्या चरणी लीन होतात. या यात्रोत्सवात सहभागी होणारा प्रत्येक भाविक मैदा, तूप, साखर यापासून बनवलेली जिलेबी प्रसाद म्हणून घेतात. यात्रोत्सवात जीवनावश्यक वस्तूची दुकाने तसेच भाविकांच्या मनोरंजनाचे गगनचुंबी पाळणे ही आले आहे. नैताळे येथे जिल्ह्यातील सर्वात मोठी बांबूची बाजारपेठ असल्याने त्याचबरोबर शेती, अवजारे, लाकडी वस्तूंची दुकाने आणि साबुदाण्याची घाऊक विक्री यात्रा काळात होते.



श्री.मतोबां महाराजांच्या रथाला बैल जोडी जुंपण्यासाठी परिसरातील शेतकरी बैलांना पोळ्या प्रमाणे सजवतात .तसेच यात्रेत समजून रथाला जुंपतात. पारंपारिक कला असलेले कारागीर आपल्या वस्तू आणि साहित्याची विक्री करण्यासाठी राज्यासह परराज्यातून येतात. त्याचबरोबर खेळण्या, खाद्यपदार्थ आणि लोखंडी वस्तू खरेदी विक्रीला चालना देणारी ही यात्रा आर्थिक उलाढालीचे मोठे व्यासपीठ आहे. त्यामुळे नागरिक येथे नवसपूर्ती झाल्यानंतर खरेदीला मोठा प्रतिसाद देतात. मतोबा महाराजांचे मंदिर अत्याधुनिक करण्यात आलेले आहे. देवाची मूर्ती लक्षवेधी आहे. पण गाभारा आरसी महाल पद्धतीने सजवण्यात आलेला आहे.

संपूर्ण काचेचं काम केलेलं असल्याने मंदिर आणि गाभारा आरसे महाल पद्धतीने बनवण्यात आलेला आहे. त्यामुळे दर्शनासाठी गेलेल्या भाविकांना चैतन्यदायी वातावरणाची अनुभूती येते. येथील प्रसाद म्हणून नागरिक खास पद्धतीने बनवलेली जिलेबी खरेदी करतात .त्यामुळे जिलेबी बनवणारे कारागीर जागोजागी ठिय्या मांडून गरमागरम जिलेबी चे घाणे काढताना दिसतात. बच्चे कंपनीचे आकर्षक असलेले राहट पाळणे, खेळणी, मौत का कुवा आणि इतर साहशीखेळ यात्रेचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. पारंपारिक मनोरंजनाची साधन आणि लोककला असलेल्या तमाशा कलावंतांना सलग पंधरा दिवस यात्रेमुळे येथे आपले फड टाकतात. त्यामुळे इतर कोठेही न दिसणारे दुर्मिळ तमाशा मतोबा महाराज यात्रेत आवर्जून पाहायला मिळतात. यामुळेच शनिवार, रविवारी नोकरदारांचा सुट्टीचा वार असल्याने चारही बाजूंनी रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नैताळे यात्रेत अलोट गर्दी दिसून आली. मात्र श्री.मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टच्या वतीने दूरवरून येणाऱ्या प्रत्येक भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता येईल. यात्रेत, लाईट, पाणी आरोग्याच्या दृष्टीने तसेच भुरट्या चोरांपासून आवश्यक सर्व बाबीची काळजी ग्रामपंचायत कार्यालय,

प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच निफाड पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी यांनी चोख व्यवस्था करण्यात आल्याची माहिती श्री मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव बोरगुडे व सर्व विश्वस्त मंडळातील पदाधिकारी यांनी दिली.

# महाबळेश्वर येथे बाळासाहेब ठाकरे जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२३, महाबळेश्वर (सातारा) :** अखंड हिंदुस्थानाचे कैवारी, प्रबोधनकार सुपुत्र, मराठी मनाचे मानबिंदू, हिंदु अस्मितेचे शिरोमणि, हिंदुस्तानातील एकमेव हिंदुहृदयसम्राट सरसेनापती शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त साहेबांच्या

प्रतीमेस शिवसेना जिल्हाप्रमुख राजेश दादा कुंभारदरे, यशवंत घाडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजेश दादा कुंभारदरे व घाडगे यांनी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबत मनोगत व्यक्त करत ठाकरे कुटुंबासोबत एकनिष्ठ रहाण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे नियोजन शहरप्रमुख राजाभाऊ गुजर यांनी केले. तसेच महाबळेश्वर नगरपालिकेच्या वतीने मुख्य लिपिक आबा ढोबळे व कर्मचारी यांनी पुष्पहार अर्पण केला अभिवादन केले. यानतंर सर्व शिवसैनिकांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.




यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख राजश्री भिसे, तालुकाप्रमुख अभिषेक शिंदे, आरोग्य सेना तालुका समन्वयक शंकर ढेबे, नगरसेवक, शहरप्रमुख सुनील नाना साळुंखे, युवसेना शहरधिकरी आकाश साळुंखे, नगरसेवक ज्येष्ठ शिवसैनिक रमेश शिंदे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सुजाता मोरे, महिला आघाडी उपशहरप्रमुख वसुधा बगाडे, पौर्णिमा मोहिते, एकनाथ मोरे, तात्या साळुंखे, आरोग्य सेना शहर समन्वयक अमोल साळुंखे, प्रशांत मोरे, बाळासाहेब ढेबे, अशोक ढेबे, अतुल पारवे, दीपक ताथवडेकर, वैभव शिंदे तापोळा, कामगार सेना युनिट प्रमुख अमर सरतापे, गणेश शिंगरे, प्रकाश ढेबे, संजय ढेबे, दत्तात्रय जाधव बोपेगाव, नयन वन्ने, शाहनवाझ खारकंडे, समीर तांबोळी, जावेद शेख, शशीकांत जाधव रामचंद्र आखाडे रामदास आखाडे, कुरेशी, अभिजित कानडे, जितेश कुंभारदरे, यशवंत भिलारे, अंकुश उलालकर, सातारा जिल्हा प्रसिद्धी जिल्हाप्रमुख चंद्रकांत पांचाळ आदी शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

# महिलेला शिवीगाळ, धमकी प्रकरणी उमेश शिंदेची पत्रकारिता रद्द करण्याची मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२३, गुहागर :** महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून नुकतीच गुहागर तालुक्यात एका खाजगी कंपनीत नोकरी करणाऱ्या ३८ वर्षीय महिलेला वेळणेश्वर येथील उमेश शिंदे तरुणाने अश्लील भाषेत शिवीगाळ करत तिला धमकावल्याची घटना समोर आली आहे. सदर बाबत पीडित महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली असुन पोलीस यंत्रणेकडून अधिक तपास सुरू आहे. ह्या घटनेचा सर्व स्तरातून तीव्र संताप व्यक्त केला जात असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ह्याच अनुषंगाने गुहागर मनसेच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि तहसीलदार यांना गुहागर तालुक्यातील महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधी कठोर कारवाई करण्याचे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की,

गुहागर तालुक्यातील जानवळे येथील एका महिलेच्या तक्रारीवरुन गुहागर पोलिस ठाण्यात एका तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. संबंधित महिलेला अश्लिल भाषेत बोलणे, शिविगाळ करणे असे विकृत,विघातक कृत्य



संबंधित तरुणाकडून घडले

असून अद्यापही या तरुणावर पोलिसांकडून कारवाई झालेली नाही, याचा आम्ही गुहागर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे निषेध व्यक्त करतो.केवळ तालुक्यातीलच अशा घटना घडलेल्या नव्हेत अन्यत्र ठिकाणी अशा विकृत समाजविघातक गोष्टी घडत असताना त्यांकडे होणारे दुर्लक्ष समाजाची दिशाभूल

करणारे आहे. गुहागर तालुक्यातील महिलेविषयक घडलेली ही लज्जास्पद बाब आहे. शासन एकिकडे लाडकी बहीण यांसारख्या महिला सन्मान योजना राबवित असताना दुसरीकडे त्यांच्यावर अशापध्दतीने अन्याय, अत्याचार होत आहे. महिला अशा गोष्टींना बळी पडत आहेत.

त्यांच्याकडून येणाऱ्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याचे जानवळे घटनेवरुन समोर येत आहे. संबंधित तरुणाला अटक करुन कठोर कारवाई करावी आणि त्यांची पत्रकारीता रद्द करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. पुन्हा एकदा गुहागर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून या घटनेचा आम्ही निषेध करत असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी म्हटले आहे. जिल्हाध्यक्ष संतोष नलावडे, रत्नागिरी उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर, तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर सहसंपर्क अध्यक्ष समीर जोशी सचिव संदेश साळवी विनोद चिपळूणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी जानवळे ग्रामपंचायत उपसरपंच वैभवी विनोद जानवळकर, विभाग अध्यक्ष सान्वी सुवरे, निशा शेटे, स्नेहा साखरकर,आरती जानवळकर, शहर सचिव अभिजित रायकर उपतालुका अध्यक्ष जितेंद्र साळवी, विभाग अध्यक्ष विश्वजीत पोतदार, प्रशांत साटले, राहुल जाधव महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जी/दक्षिण विभागाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२३, वरळी :** गेल्या चार वर्षांपासून कोविड च्या संक्रमण काळामुळे ठप्प झालेल्या शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धा अखेर संपन्न झाल्या असून या स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला असल्याचे दिसून आले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या २०१९ पासून बृहन्मुंबई महापालिका शालेय स्तरावर वार्षिक क्रीडा स्पर्धा झाल्याच नव्हत्या. परंतु या वर्षी महानगरपालिका शिक्षण विभागाने वरिष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे आणि पर्यवेक्षक दत्तू लवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रकारच्या क्रीडा स्पर्धा घेण्यासाठी परवानगी दिली होती.त्या अनुषंगाने दि.१३जानेवारी ते २३ जानेवारी या दरम्यान शा.शि.चे कनिष्ठ पर्यवेक्षक अंकुशराव बागल यांच्या नियोजनाखाली जी/दक्षिण विभागातील ४३ शाळांतील सुमारे २००० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. ही स्पर्धा एकूण चार गटात घेण्यात



आली. स्पर्धेत २५,५०,७५,आणि १०० मीटर धावणे,आणि लंगडदौड,रस्सीदौड,खडी खडी लांब उडी आणि बटाटा शर्यत अशी घेण्यात आली. मूला मुलींच्या प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक निवडण्यात आले. तसेच याच स्पर्धेत चौदा वर्षाखालीलच पण ज्यांची उंची जास्त होती अशा विद्यार्थ्यांसाठी मैदानी स्पर्धा घेण्यात आली. थाळी फेक,गोळा फेक, आणि लांब उडी या मैदानी स्पर्धेत ९ मुलगे आणि ९ मुली अशा १८ उत्कृष्ट खेळाडू मुलामुलींची निवड करण्यात आली. प्रथम या स्पर्धा १)ना म जोशी मार्ग येथील श्रमिक मैदान, २)डॉ बाबासाहेब आंबेडकर शाळा मैदान,३) आग्रीपाडा मैदान, ४) वरळी स्पोर्ट्स क्लब मैदान येथे संकुल स्तरावर घेण्यात आल्या.

स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना आकर्षक मेडल व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. विभागीय अंतिम स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता श्रीवास्तव आणि कनिष्ठ पर्यवेक्षक अंकुशराव बागल यांच्या शुभहस्ते विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

या क्रीडा स्पर्धेचे आयोजन नियोजन उत्तम प्रकारे करून स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जी/दक्षिण विभातील दै.अक्षराजचे पत्रकार व शा.शि.शिक्षक प्रभाकर हजारे, रश्मी राणे, गणेश डहाळे, नितीन येलवे आणि संजय माने यांनी मेहनत घेतली.

# थोडक्यात

## ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ उपक्रमास १० वर्ष पूर्ण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ या उपक्रमामुळे लिंगभेद चाचणी पद्धतींना प्रतिबंध करण्यासाठी तसेच, मुलींचे संरक्षण आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण योगदान मिळाले आहे. या ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ या उपक्रमाला दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी १० वर्ष पूर्ण होत असल्याने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आज विषेश कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ या उपक्रमाला दहा वर्ष पुर्ण होत असून स्त्रियांचा सन्मान करणे महत्त्वाचे आहे. मुलींच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक समानतेसाठी सर्वांनी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

यावेळी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, जिल्हा कृषी अधिकारी एम.एम. बाचोटीकर, लघुपाट बंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

मी प्रतिज्ञा करते / करतो की, मी मुलगी आणि मुलगा यांना समान मानेल व स्त्रीभ्रूण हत्येचा आणि असे कृत्य करणाऱ्यांचा विरोध करेन. मी मुलीच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक समानतेसाठी सदैव कटीबध्द राहीन. ‘बेटी बचाओ बेटी पढ़ाओं’ या राष्ट्रीय अभियानात सहभागी होवून अभियानाच्या यशस्वीतेसाठी सदैव प्रयत्नशील राहीन. ही सामूहिक शपथ यावेळी घेण्यात आली.

## सावली नर्सिंगची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल सावली प्रतिष्ठान संचलित सावली स्कूल ऑफ नर्सिंगच्या आर. ए. एन. एम. प्रथम वर्ष या वर्षीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या कॉलेजची निकालाची परंपरा सलग १५ व्या वर्षीही कायम राहिली आहे. यावर्षी या कॉलेजमधील अलिशा शेख हिने ८२.३३ टक्के गुणांसह प्रथम, बेबी थोरात हिने ८०.५५ टक्के गुणांसह द्वितीय तर मीरा मुंढे हिने ७९.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. दरवर्षी कॉलेज मार्फत एड्स जनजागृती फेरी, रक्तदान शिबीरे, सर्व रोगनिदान शिबिर, पथनाट्ये आदी उपक्रम तसेच साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल या ग्रामीण भागातील सुसज्ज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मुलींना प्रॅक्टिस दिली जात असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी दिली. या सर्व विद्यार्थीनींना प्राचार्य सुशांत शिंदे, प्रा. नामदेव वाळुंज, प्रा. वैशाली पानसरे, प्रा. शितल गर्कल, प्रा. पुष्पा घुले यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व गुणवंत विद्यार्थीनींचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, डॉ. अश्विन खंदारे, डॉ. स्वाती खिलारी, संस्थेचे अध्यक्ष प्रताप खिलारी, सचिव संतोष सोनावळे, संदिप खिलारी, प्रसाद सोनावळे, नितीन आंधळे, गणेश चव्हाण तसेच साई सावली हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

## पैठण शिवसेनेच्या वतीने शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.२३,पैठण :** शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्ताने पैठण येथे शिवसेनेच्या वतीने स्व. ठाकरे यांना अभिवादन करण्यात आले. शहर व तालुका शिवसेनेच्या वतीने गुरुवारी (दि. २३ जानेवारी) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी पाचोडचे सरपंच शिवराज भुमरे, दुध संघाचे संचालक नंदलाल काळे, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, शहरप्रमुख तुषार पाटील, नामदेवराव खराद, शेखर शिंदे, किशोर तावरे, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, राजू गायकवाड, माजी नगरसेवक भुषण कावसनकर, बाळासाहेब माने, ईश्वर दगडे यांच्यासह शिवसैनिकांनी शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. खासदार संदिपान भुमरे व आमदार विलास भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना शहरप्रमुख तुषार पाटील व तालुकाप्रमुख अण्णासाहेब लबडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी खुशाल भवरे, संतोष सव्वाशे, प्रशांत जगदाळे, सुनिल हिंगे, संजय कस्तुरे, राजु मापारी, शाम पंजवाणी, मनीष औटे, योगीराज बुंदिले, मोतीलाल घुंगासे, सचिन पोटे, संजय सोनारे, विकी खांडेकर, आबासाहेब गिरगे, संतोष बोठे, अमोल सपकाळ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामटेकडी उड्डाण पूल डिव्हायडर उंची अपघाताला आमंत्रण

**अक्षराज : धीरज महांगरे**

**दि.२३, हडपसर :** हडपसर आणि ट्रॅफिक हे गणित पुण्यातील कोणाला माहित नाही असं अजिबात नाही, यातच भरीत भर म्हणजे फेल गेलेला बीआरटी प्रकल्प, नागरिकांची सोय व्हावी म्हणून बी आर टी प्रकल्प राबवण्यात आला पण त्याचे पुढे काय झाले हे सर्वांनीच पाहिले आहे, बीआरटी प्रकल्प पूर्णतः फेल गेल्यानंतर पुन्हा ते टाकलेले डिव्हायडर काढण्यात आले, नागरिकांची सोय झाली का गैरसोय झाली याचा विचार प्रशासनानेच करावा, पण एक गोष्ट सांगावीशी वाटते की हडपसर मधील रामटेकडी वैदवाडी यांना जोडणारा जो उड्डाणपूल आहे त्या उड्डाणपुलाचा मधला डिव्हायडर फारच कमी उंचीचा आहे, त्यामुळे संध्याकाळी सात नंतर येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांच्या लाईट्समुळे उड्डाण पुलावरील डिव्हायडर चा अंदाज येत नाही आणि अपघात होतात. महापालिकेने प्रशासनाने या महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष दिले पाहिजे, कोणाचा जीव गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा कोणाचा तरी जीव जाऊ नये म्हणून आधीच केलेली सुरक्षिततेची उपाययोजना केव्हाही कौतुकास्पद ठरेल. या उड्डाणपुलावरील बी आर टी चे डिव्हायडर काढलेले आहेत. ट्रॅफिकचा सारासार विचार करून हा निर्णय घेण्यात आला असावा, परंतु हे करत असताना या उड्डाण पुलावरील अपुरा प्रकाश आणि डिव्हायडरची कमी उंची, वाहनांच्या लाईटचा प्रखर प्रकाश डोळ्यावर पडून डिव्हायडर चा अंदाज येत नाही व अपघात होतात याकडे दुर्लक्ष झाले आहे.